चंद्रपूर येथे सैनिकी शाळेच्या बांधकाम व पायाभूत सुविधांचे बांधकामाच्या अनुषंगाने वाढीव कामे, जीएसटी,अपेक्षित भाववाढ व इतर टक्केवारी यामध्ये वाढ झाल्यामुळे रु.२०४.०७ कोटी इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याबाबत

महाराष्ट्र शासन,
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,
शासन निर्णय क्र. चंसैशा - २०१९/ प्र.क्र.७५(भाग-१)/एसएम-६
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २९.०६.२०१९

वाचा :

१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. इसैशा-२०१६/ प्र.क्र.९६/ एसएम-६ दिनांक १३.०४.२०१७

२) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. चंसैशा-२०१७/ प्र.क्र.५५/ एसएम-६ दिनांक २२.०८.२०१७

३) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. चंसैशा २०१८/ प्र.क्र. ३३/ एसएम-६ दिनांक १२.०९.२०१८

४) मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचे पत्र क्र. जिपचं/शि(मा)/सैशा/ १०१७/२०१९,दिनांक ०४.०४.२०१९

५) अधिक्षक अभियंता यांचे पत्र क्र. ४०४८/का.२(५)/२०१९, दि. १२.०६.२०१९

प्रस्तावना :

भिवकुंड, जि. चंद्रपूर येथील सैनिकी शाळेच्या प्रवेशद्वारासह संरक्षण भिंत, सिमेंट काँक्रीट नालीसह पोचमार्गाचे बांधकाम करण्याबाबतच्या रु. १२३६.७७ लक्ष इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास संदर्भाधीन क्र. (१) येथील दिनांक १३.४.२०१७ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता दिली आहे. तसेच चंद्रपूर सैनिकी शाळेच्या इमारती व पायाभूत सुविधांचे बांधकामासाठी रु. २९६.८५ कोटी रकमेच्या अंदाजपत्रकास संदर्भाधीन क्र. (२) येथील दिनांक २२.८.२०१७ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता दिली आहे. चंद्रपूर सैनिकी शाळेच्या अतिरिक्त (भाग-२) बांधकामासाठी रु.१९२.०० कोटी रकमेच्या अंदाजपत्रकास संदर्भाधीन क्र. (३) येथील दिनांक १२.९.२०१८ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता दिली आहे.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांनी यांनी दि. ४.४.२०१९ च्या पत्रान्वये भिवकुंड, ता. बल्लारपूर येथे सैनिकी शाळेचे बांधकाम व पायाभूत सुविधाचे बांधकामाचे अनुषंगाने वाढीव कामे, जीएसटी, अपेक्षित भाववाढ व इतर टक्केवारी मध्ये वाढ झाल्यामुळे पायाभूत सुविधा (भाग-१) व अतिरिक्त बांधकाम (भाग-२) या कामांकरीता अनुक्रमे रु. ३५७.२० कोटी व रु. २०४.०७ कोटी इतक्या रकमेची अंदाजपत्रके सुधारित प्रशासकीय मान्यतेस्तव सादर केली आहेत. मा. मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या दिनांक १०.०६.२०१९ रोजीच्या उच्चाधिकार समितीच्या बैठकीत सचिव समितीने सदर भाग-१ व भाग-२ च्या अनुक्रमे रु. ३५७.२० कोटी व रु. २०४.०७ कोटी इतक्या रकमेस

सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यास सहमती दिली आहे. यापैकी पायाभूत सुविधा (भाग-१) कामाकरीता रु. ३५७.२० कोटी इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याबाबतची कार्यवाही स्वतंत्रपणे करण्यात येत आहे. भिवकुंड, ता. बल्लारपूर, जि.चंद्रपूर येथे सैनिकी शाळेचे अतिरिक्त बांधकाम (भाग-२) या कामाच्या रु. २०४.०७ कोटी रकमेच्या अंदाजपत्रकास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

भिवकुंड, ता. बल्लारपूर, जि. चंद्रपूर येथे सैनिकी शाळेचे अतिरिक्त बांधकाम (भाग-२) अनुषंगाने वाढीव कामे, जीएसटी, अपेक्षित भाववाढ व इतर टक्केवारी मध्ये वाढ झाल्यामुळे रु. २०४.०७ कोटी (रुपये दोनशे चार कोटी व सात लक्ष फक्त) इतक्या किंमतीच्या अंदाजपत्रकास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. ही मान्यता शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दिनांक १७.०४.२०१५ मधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग-५, परिशिष्ट-१३४ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार मंजूर करण्यात येत आहे.

३. सदर कामाचा खर्च उपलब्ध निधीतून भागवावा.

४. सदर काम सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त रक्कमेत पूर्ण होईल, याची दक्षता घ्यावी.

५. सदर खर्च सन २०१९-२० या आर्थिक वर्षात "मागणी क्र. ई-४, ४२०२- शिक्षण, क्रीडा, कला,व संस्कृती यावरील भांडवली खर्च, ०१ सर्वसाधारण शिक्षण, २०२ माध्यमिक शिक्षण, (०१)- सैनिकी शाळेचे बांधकाम, (००) (०५) चंद्रपूर येथे सैनिकी शाळेचे बांधकाम करणे (कार्यक्रम), (४२०२ ६४३३), ५३ मोठी बांधकामे" या लेखाशिर्षातून खर्ची टाकण्यात यावा. सदर निधी वितरीत करण्यासाठी आयुक्त शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना "नियंत्रक अधिकारी" तसेच शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, चंद्रपूर यांना "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे. नियंत्रक अधिकारी यांनी कामाबाबतचा अहवाल वेळोवेळी शासनास सादर करावा व याबाबत महालेखापाल कार्यालयाशी ताळमेळ करुन त्याबाबतचा अहवाल सादर करावा.

६. सदर आदेश सार्वजनिक बांधकाम विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र. १२०/इमा-३, दिनांक १२.०६.२०१९ अन्वये प्राप्त सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.,maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०६२९१५२११४७५२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Swati Madhukar Nanal

Digitally signed by Swati Madhukar Nanal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=82e1d6f07c5cabf5884958ee70015d36b35b2c07e9700fe62cba2439a81b4be4, serialNumber=007d84f8ce44beba86b0ca2d0155d67cc1a9db4f8d59bc9d8067628d62bcdc1a, cn=Swati Madhukar Nanal
Date: 2019.06.29 15:25:23 +05'30'

(स्वाती म. नानल)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मुख्यमंत्री सचिवालय यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई ३२

२. सर्व विधान सभा /विधान परिषद सदस्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई

३. मुख्य सचिव यांचे उप सचिव
४. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
५. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
८. जिल्हाधिकारी, चंद्रपूर
९. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नागपूर,
१०.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
११.शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
१२.विभागीय शिक्षण उप संचालक,नागपूर विभाग, नागपूर
१३.अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, चंद्रपूर
१४.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. २, चंद्रपूर,
१५.शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद चंद्रपूर
१६.शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद चंद्रपूर
१७.कक्ष अधिकारी , (व्यय ५), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१८.कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
१९.निवडनस्ती.

प्रत माहितीसाठी-

१. मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२
२. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय,मुंबई ३२
३. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई ३२